**अत्यंत तातडीचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/ ०९ /२०१९
दिनांक :- ०५ / ०१/२०१९

माहितीचा अधिकार

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५**
**नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करुन देणेबाबत...**

**परिपत्रक**

शासन परिपत्रक **क्र.संकिर्ण २०१८/प्र.क्र.४५/कार्या-६ दि.२६ नोव्हेंबर २०१८** अन्वये शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येण्यासाठी व माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त माहिती अर्जांची, प्रथम व व्दितीय अपिलीय अर्जांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने राज्यातील जिल्हास्तरीय कार्यालयांपासून ते निमस्तरीय सर्व कार्यालयात तसेच महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद इत्यादी सर्व कार्यालयात प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत नागरिकांना **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** अंतर्गत विहित प्रक्रियेनुसार त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व जनमाहिती अधिकारी व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या दरानुसार नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी पहिला तास मोफत व त्यानंतर प्रत्येक पंधरा मिनिटांना किंवा त्याच्या भागाला रुपये ५/- याप्रमाणे प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** अंतर्गत **कलम ६(१), व कलम ४ ब** नुसार अभिलेखांची पाहणी करण्यास मोबाईल अथवा इतर अत्याधुनिक साधनांचा वापर न करता अभिलेख उपलब्ध करून द्यावेत. सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करणेत यावी.

**अति.आयुक्त (१),**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व जनमाहिती अधिकारी / विभागप्रमुख,
------------------------------------ विभाग.

सोबत :- शासनाकडील दि.२६ नोव्हेंबर २०१८ रोजीचे परिपत्रक

Scanned with CamScanner